JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# संत साहित्याच्या संशोधनातील प्रामाणिकता

**संशोधक**
**प्रशांत अशोकराव घुगे**
**महात्मा ज्योतिबा फुले शाळा,**
**मोठी उमरी, अकोला**

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. शिवाजी नागरे**
**शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व**
**वाणिज्य महाविद्यालय, अकोला**

**प्रस्तावना**

आज समाजाला संशोधनाची गरज आहे. संशोधनातून नवे विचार, नवी दिशा मिळते. त्यामुळे साहित्यातील वेगवेगळ्या बाजू जगासमोर येतात. भाषेला त्यातून नित्य नूतन स्वरूप प्राप्त होते. संशोधन अभ्यासाचे विविध प्रकार आहेत. संशोधकाचा साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन जसा असतो. त्यावर त्याची मौलिकता अवलंबून असते. सर्वच विचार प्रणालीमध्ये संशोधनाची कल्पना ही अपरिवर्तनीयतेच्या कल्पनेतून निघालेली असते. स्वामी विवेकानंदांनी लंडन येथील भाषणात एक उदाहरण दिले. "या विश्वाला जसे आपण जाणतो व ते जसे आहे. असे आपल्याला वाटते. तसे त्याचे स्वरूप तसे नाही; ते अपरिवर्तनीय तत्व या विश्वाचे रूप घेताना मुळी परिवर्तन पावलेच नाही आणि हे संपूर्ण विश्व केवळ आभास असून ते सत्य नाही. अशांची, शूद्र जीवांची, भेदांची कल्पना केवळ आभासात्मक असून मूळ तत्वाचे ते खरे रूप नाही."[१] 'जशी दृष्टी तशी सृष्टी' या म्हणीप्रमाणे संशोधकाची जशी दृष्टी तसे त्याचे संशोधन आकारास येते. आणखी स्पष्ट करण्यासाठी अद्वैती उदाहरण देतात. रात्रीच्या अंधारात झाडाचे खोड भाबडया माणसाला भुतासारखे दिसते, चोराला शिपायासारखे आणि मित्राची वाट पाहणाऱ्या माणसाला तेच खोड आपल्या मित्रासारखे वाटत असते. या सर्व आभासात ते खोड काही बदललेले नसते. पण त्यात वरवर पाहता भासणारे बदल घडून येतात. ते बदल पाहणाऱ्याच्या मनावर अवलंबून असतात.

संशोधनामध्ये व्यवहारिकता आणि नितीशास्त्र यांची नितांत निकड आहे. संशोधन ज्ञानाचा प्रसार करते. त्यामुळे त्यात योग्य माहितीचा प्रसार होणे महत्त्वाचे आहे. समाजापर्यंत चुकीच्या ज्ञानाचा प्रसार झाल्यास सामान्यांची वैचारिकता तशीच तयार होत जाते. लिखाणाचा दर्जा जितका चांगला असेल वाचकही तितकाच समृद्ध होतो. ज्ञानाचा प्रसार करण्याचा अधिकार सगळयांना आहे. लेखकाचा दृष्टिकोन समान असणे महत्त्वाचे आहे.

**विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तीनि |**
**शुनि चैव श्वपाकेच पंडित: समदर्शिन:||**
**इहैव तैर्जित: सर्गो येषा साम्ये स्थित मन: |**[२]

विद्वान ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा किंवा चांडाळ या सगळ्यांना जो समदृष्टीने पाहतो तोच महात्मा होय. तोच ज्ञानी पुरुष होय. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे संशोधकाकडे डोळस दृष्टी असावी.

वेदांताने सांगितलेले तत्व संशोधनासंबंधी पुरेपूर लागू पडते. संशोधकाची स्थिती- दृष्टी ही तटस्थ असावी. संशोधनांमध्ये वैयक्तिक भावभावनांना स्थान नाही. संशोधकाने आपल्या संशोधनासंबंधी प्रामाणिक असणे महत्त्वाचे आहे. तेच अपेक्षितही आहे.

**संत तुकारामांच्या संशोधनातील प्रामाणिकता**

संत तुकाराम पूर्णपणे मानवी संत होते. साधे भोळे संसारी पुरुष होते. सत्व जपणारे झुंजार वादळी व्यक्तिमत्व होते. महाज्ञानी आणि दृष्टा होते. तुकोबांनी संपूर्ण आयुष्यात कोणताही अवैज्ञानिक चमत्कार केलेला नाही. त्यांचे संपूर्ण जीवन भक्तीसह वस्तुनिष्ठ आणि विवेकनिष्ठ होते. अनुभवसिद्ध आणि प्रयोगसिद्ध होते. तुकारामांचे जीवन, कार्य आणि त्यांच्या काव्याचे पारदर्शक मूल्यमापन केल्याचे क्वचितच आढळते. उलट सांप्रदायिकता, जातीयता, तुच्छता अशा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून आज पर्यंत तुकारामांचे मूल्यमापन झाल्याचे दिसते.

संत तुकारामांचे साहित्य निखळ प्रेमापोटी निर्माण झाले. त्यात कुठलाही वैयक्तिक हेतू नाही. दैनंदिन जीवनात येणारे अनुभव त्यांनी आपल्या लेखनामध्ये बंदिस्त केले आहेत. तुकारामांची भाषा, वागणे, रागावणे, सामान्य माणसासारखेच होते. तुकाराम सहज सामान्य जीवन जगले. सामान्य संसारीकाच्या जीवनात येणारे आनंदाचे, दुःखाचे दिवस त्यांच्याही जीवनात आले. सामान्यांचा एखादा दिवस आनंदाचा, उत्साहाचा निघतो, तर कधी उदासलेला, रागाचा असतो. तुकारामांचेही तसेच होते. जसा दिवस तशी त्यांची अभंगवाणी वळण घेते. तुकारामांचे लिखाण लवचिक आहे. ते पूर्वनियोजित नाही. जसा प्रसंग तसे काव्य निर्माण झाले आहे. त्यामुळे तुकारामांच्या अभंगावरून त्यांच्या जीवनातील, स्वभावातील अचूक अंदाज काढणे कौशल्य आहे.

संशोधक कोणत्या संप्रदायाचा आहे. तो ईश्वरवादी आहे, की निरीश्वरवादी आहे. तो दैववादी आहे. की नास्तिक आहे. या सर्व बाबी संत साहित्यातील संशोधनावर प्रभाव टाकतात. संशोधनात संशोधकाची भूमिका महत्त्वाची आहे.

तुकाराम साहित्य अभ्यासकांची डॉ. किशोर सानप यांनी गटनिहाय विभागणी केली आहे. बहिणाबाई, महिपती हे पारंपारिक आहेत. तर राजवाडे, भावे, चिपळूणकर हा विरोधकांचा गट आहे. सावरकर, कोलते, कवडे हे परखड विचार मांडणारे आहेत. तर भालचंद्र नेमाडे, दिलीप चित्रे, सदानंद मोरे, डॉ. आ.ह. साळुंखे व किशोर सानप हे तुकारामांची बाजू मांडणारे आहेत.

महिपती बाबा ताहराबादकरांनी तुकोबांच्या निवारानंतर १२५ वर्षांनी तुकारामांची काल्पनिक चरित्रे लिहिली. तीच अभ्यासाची साधने म्हणून अनेकांनी उपयोगात आणली. संशोधकांनी पोथ्यापुराणांचे दाखले तर्कनिष्ठ, वस्तुनिष्ठ आणि विवेकवादी दृष्टिकोन समोर ठेवून दिले पाहिजेत. परंतु तसे तारतम्य संशोधक-अभ्यासकांनी दाखवल्याचे दिसत नाही. तुकारामांच्या अभंगाचा अभ्यास करताना अभ्यासकांचा स्वतःचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे.

**सत्य असत्याशी मन केले ग्वाही | मानियेले नाही बहुमता||**

तुकोबांची पद्धती संत साहित्याच्या अभ्यासात वापरावी लागते. तुकोबांचा अभ्यास म्हणजे एक स्वतंत्र ज्ञान शाखेचा अभ्यास आहे. त्यांचा स्वतःचाच एक निरपेक्ष, तटस्थ आणि सत्यान्वेषी दृष्टिकोन होता. तुकाराम स्वतःच मोठे अभ्यासक, चिकित्सक आणि संशोधकही होते. त्यांनी संतमते, पुराने, शास्त्रे तपासून आणि अनुभव घेऊनच आपला दृष्टिकोन तयार केला. तुकोबांच्या दृष्टिकोनातूनच अभ्यासाचे एक तर्कनिष्ठ आणि सत्यान्वेषी चिकित्सा शास्त्र, पद्धतीशास्त्र सिद्ध होते. अभ्यासकाला संत साहित्याचा अभ्यास करावयाचा असेल, तर संतांच्या दृष्टिकोनातूनच करावा लागेल.

अभ्यासकांचा एक ठरलेला पूर्वग्रह असतो. विचारांची बांधिलकी असते. आपल्याच चष्म्यातून अभ्यासात जेव्हा तुकारामांचा अभ्यास करतात. तेव्हा त्यांचे निष्कर्ष ही पूर्वग्रह दूषित निघतात.

महिपती बुवा ताहराबादकर यांनी भक्ती विजय (१७६२) व भक्तिलीलामृत (१७७४) असे दोन ग्रंथ लिहिले. ते संतांचे चरित्रकार म्हणून ओळखले जातात. त्यांच्याबद्दल डॉ. किशोर सानप म्हणतात- "महिपती बाबा यांची चरित्रे संतांना महात्म्य प्राप्त करून देण्यासाठी आहेत. त्यात जास्तीत जास्त अवैज्ञानिक चमत्कारांचा वापर केलेला आहे. त्यामुळे त्यांची चरित्रे अवास्तव, अवैज्ञानिक चमत्कारांना प्राधान्य देणारे आणि निराधार स्वरूपाचे आहेत."[३] तसेच स्वतः महिपतीबाबा ताहराबादकर हे लिहितात-

**म्या पाहिला नाही अमरकोश | गीर्वाण भाषा तीही नि:शेष |**
**नाना पुराने विशेष | श्रवण सायासे न केली की ||**[४]

जो चरित्रकार स्वतः विशेष चिंतन, मनन, पठण, संशोधन न करता ग्रंथ निर्मिती केल्याची कबुली देतो. अशा चरित्रकाराचे ग्रंथ ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाण मानणे योग्य ठरणार नाही. संतांच्या चरित्राला चमत्कारांचा जंग लावणे यथोचित ठरणार नाही.

बहिणाबाई यांनी आपल्या अभंग गाथेत तुकारामांच्या सहवासातील आठवणी लिहिल्या आहेत. बहिणाबाई शिऊरकर तुकोबांच्या स्वयंघोषित शिष्या होत्या. तुकारामांपासून प्रेरणा घेऊन बहिणाबाईंनी अभंग लिहिले. त्यांच्या अभंगात तुकाराम चरित्राची बरीच माहिती मिळते. महिपती बाबा ताहराबादकरांपेक्षा बहिणाबाईंच्या गाथेत तुकारामांचे चरित्र स्पष्ट पण अल्पसे आहे. त्यांच्या अभंगातही भक्तीभावामुळे आणि अध्यात्मिक अनुभवामुळे चमत्कृती जाणवते.

साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला की, संशोधनातील तथ्य कशी बदलतात याची काही उदाहरणे पाहता येतील. डॉ. सदानंद मोरे तुकाराम दर्शन मध्ये लिहितात- "बुद्धप्रणित अहिंसा हे तत्त्व होते. गांधींचा अहिंसा हा नियम आहे. मनुष्य नियमांचा गुलाम असतो. तत्त्वांचा मनुष्य उपासक असतो. गुलाम नसतो."[५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते अहिंसेची संकल्पना दुहेरी स्वरूपाची आहे. ती ते तुकोबांच्या शब्दात सांगतात- **दया तिचे नाव भूतांचे पालन | आणिक निर्दालन कंटकांचे||** प्राणीमात्रांच्या पालनाबरोबरच दुष्टांचे निर्दालन अहिंसेचाच भाग आहे. गांधीजींची अहिंसा या दोनपैकी पहिलाच भाग विचारात घेते. त्यामुळे ती अपूर्ण स्वरुपाची आहे. तुकोबांची अहिंसा ही परिपूर्ण आहे. असे डॉ. आंबेडकरांचे मत मोरे यांनी सांगितले आहे.

संशोधकाने तर्क-वितार्काद्वारे आपले मत मांडणे स्वाभाविक आहे. डॉ. किशोर सानप आपल्या 'समग्र तुकाराम दर्शन' मध्ये सुदाम सावरकरांनी मांडलेला तर्क सांगतात. "तुकोबांची हत्या मंबाजीने केली होती. आणि रामेश्वर भटांनी मात्र तुकोबांच्या निर्याणाला शास्त्राधार देण्यासाठी, वैकुंठ गमनाची काल्पनिक कथा रचली होती. ते त्यांनी तुकोबांच्या भक्ती आणि आदरापोटी केले होते."[६] हा तर्क योग्य वाटतो. या बाबतीत रामेश्वर स्वतः साक्ष देतात. **म्हणे रामेश्वर सकाळ पुसोनी | गेला तो विमानी बैसोनिया ||** संत तुकाराम गेल्याने झालेली हानी भरून काढणे शक्य नव्हते. त्यामुळे घडलेल्या प्रसंगावर पडदा टाकण्यासाठी गहिवरल्या हृदयाने रामेश्वरांनी दैवत्वाचे झाकण टाकले. हे मत सानपांना स्वभाविक आणि तर्कसंगत वाटते. त्यांच्या मते बहिणाबाई यांनी रामेश्वर भटांबद्दल काहीही प्रतिकूल लिहिले नाही. उलट रामेश्वर भट हे विद्वान होते. त्यांच्या मताला समाजात किंमत होती. असे बहिणाबाई सांगतात.

अशाप्रकारे संशोधनातील संशोधकाचे मतप्रवाह आहेत. वेगवेगळ्या मतप्रवाहामुळे वाचकही संभ्रमात पडतो. वाचक, अभ्यासक ज्या मताचा, संप्रदायाचा असेल त्याच प्रवाहाने जाण्याचा निर्णय घेतो. क्वचित प्रसंगीच संशोधक उघडपणे प्रवाहाच्या उलट दिशेने जाण्याचे धाडस करतो. त्यात त्याला वेगवेगळे मतप्रवाह, सामाजिक संघटना, जाती, धर्म यांच्या आक्रोशाला सामोरे जाण्याची शक्यता बळावते. असे असले तरी संशोधकाने निर्भयपणे आपले मत व्यक्त करणे अपेक्षित असते. संत तुकारामांच्या पुढील ओळी त्यासाठी सहाय्यक ठरतात.

**शेवटची विनवणी | संतजनी परिसावी ||**
**विसर तो न पडावा | माझा देवा तुम्हासी ||**
**आता काय बोलो कायी | अवघे पायी विदित ||**
**तुका म्हणे पडतो पाया | करा छाया कृपेची ||**

वरवर पाहता हा अभंग अलंकारिक वाटतो. तुकारामांनी आपले कार्य उत्तम दर्जाचे घडावे अशी विनवणी केली आहे. प्रत्येक संशोधकानेही आपले संशोधन उत्तम व दर्जेदार करावे हीच यातून अपेक्षा आहे.

**निष्कर्ष**

१. मत प्रवाह व्यक्तीपरत्वे भिन्न असतात .
२. संत साहित्यातील अभ्यासकांवर सांप्रदायिक प्रभाव दिसतो.
३. संशोधकाचा दृष्टिकोन संशोधनावर प्रभाव टाकत असतो.
४. भाषेच्या संशोधनाला ऐतिहासिक साधनांची आवश्यकता आहे.
५. संत तुकारामांच्या साहित्यावर काही सन्माननीय अपवाद वगळता प्रामाणिकपणे संशोधन झालेले नाही.

**संदर्भ ग्रंथ**

१. स्वामी विवेकानंद, 'वेदांत', रामकृष्णमठ, नागपूर, प्रथम आवृत्ती, पृ.१०३
२. तत्रैव, पृ.१११
३. सानप डॉ. किशोर, 'समग्र तुकाराम दर्शन', विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सीताबर्डी नागपूर, पुनर्मुद्रन २५ जून २०१३
४. मोरे डॉ. सदानंद, 'तुकाराम दर्शन' सकाळ मीडिया, प्रा. लि.५९५, बुधवार पेठ, पुणे, दुसरी आवृत्ती- जानेवारी २०२१, पृ. ३४३
५. सानप डॉ. किशोर, 'समग्र तुकाराम दर्शन', विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सीताबर्डी नागपूर, पुनर्मुद्रन २५ जून २०१३, पृ. २५
६. तत्रैव, पृ.२४०